**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103
Estd.1962
NAAC 'A' Grade

**संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/चव्हाण/253** **दि. 13.04.2020**

# परिपत्रक

विषयः– मार्च/एपिल, 2020 मधील उन्हाळी सत्रातील परीक्षेसंदर्भात.

सदर्भः 1. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/110, दि. 03.02.2020 चे परिपत्रक.
2. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/236, दि. 16.03.2020 चे परिपत्रक.
3. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/241, दि. 27.03.2020 चे परिपत्रक.
4. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/251, दि. 07.04.2020 चे परिपत्रक.

महोदय,

मार्च/एपिल, 2020 मधील उन्हाळी सत्रातील परीक्षा प्रारंभ तारखा उपरोक्त सदंर्भ कं. 1 नुसार सर्व संबंधीतांना कळविणेत आलेल्या होत्या. तथापि, राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड–19) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात येणा–या सर्व मौखिक/प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा दि. 14 एप्रिल, 2020 पर्यंत उपरोक्त संदर्भ कं. 2 व 3 नुसार स्थगित करण्यात आलेल्या आहेत. तसेच उपरोक्त संदर्भ कं. 4 नुसार मार्च/एपिल, 2020 मधील उन्हाळी सत्रातील परीक्षा प्रारंभ तारखाबाबतचे परिपत्रक रद्द करण्यात येत असून शिवाजी विद्यापीठामार्फत मार्च/एप्रिल, 2020 मध्ये घेण्यात येणा–या सर्व मौखिक/प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा नंतर जाहिर करणेत येवून सर्व परीक्षांच्या फेरनियोजनाबाबतचा तपशील व स्वतंत्र वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करणेत येईल. असे सर्वांना कळविणेत आले आहे.

तथापि, विद्यापीठाच्या परीक्षेसंदर्भात विविध प्रसार माध्यमातून काही बातम्या प्रसारित होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होत आहे. सदर संभ्रमावस्था टाळण्यासाठी सर्व संबंधीतांना पुनःश्च एकदा कळविणेत येते की, मार्च/एप्रिल 2020 मधील उन्हाळी सत्रातील परीक्षेसंदर्भात करावयाची कार्यवाही निश्चित करण्यासाठी शासन स्तरावर 6 सदस्यीय उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आलेली असून सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर, शासनाच्या निर्देशानुसार परीक्षेसंदर्भातील करावयाची पुढील कार्यवाही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे.

सही/–

(श्री. गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–**
1) मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख
सर्व सलंग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था / अधिविभाग
2) मा. कुलगुरू कार्यालय
3) मा. प्र– कुलगुरू कार्यालय
4) मा. कुलसचिव कार्यालय